महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
Maharashtra Industrial Development Corporation
(A Government of Maharashtra Undertaking)

मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३. प्रिन्सिपल कार्यालय : ४.४ (ऐ) १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-१, कफ परेड, मुंबई ४०० ००५.
Head Office : "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093.
Principle Office : 4,4 (A), 12th Floor, World Trade Centre-1, Cuffe Parade, Mumbai-400 005.
☎:०२२-४७४८८३१२, ४७४८४६७९/९९
☎: +९१-०२२-४०१६१४५१/५४ (022-40161451/54)
www.midcindia.org

क्रमांक: मऔविम/मव्य(भूमी)/P११४०३४ दिनांक : २३/०८/२०२४

# परिपत्रक

**विषय : सुविधा क्षेत्रातून (Amenity) / मोकळ्या जागेमधून (Open Space) भूखंड वाटप करणेकरीता अर्ज करावयाची कार्यपध्दती.**

**संदर्भ: (१) परिपत्रक क्रमांक मऔविम/विधी व कामकाज/१०२, दिनांक ०९.०२.२०१०**
**(२) परिपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/ पी२०५९२५, दिनांक १५.०३.२०२४**

महामंडळाने भूखंड वाटप ऑनलाईन सरळ/निविदा पध्दतीने करणेबाबत धोरण निश्चित केलेले आहे. त्यामध्ये पूरक सेवा सुविधा तसेच सुविधा क्षेत्रामधून तसेच ओपन स्पेसमधून बिगर औद्योगिक उपयोगासाठी वापर करावयाच्या भूखंडाचे वाटप ऑनलाईन सरळ पध्दतीने किंवा निविदा पध्दतीने करण्यात यावे, याबाबत महामंडळाच्या धोरणामध्ये स्पष्टता नसल्यामुळे सर्वंकष विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२३ (CDCPR-२०२३) प्रमाणे अनुज्ञेय प्रयोजनाकरिता सुविधा क्षेत्रामधून तसेच ओपन स्पेसमधून भूखंड वाटप करणेकरीता अर्ज स्विकारणेबाबत महामंडळाच्या सदस्य मंडळाच्या दिनांक ०६.०३.२०२४ रोजी झालेल्या ३९९ व्या बैठकीमधील ठराव क्रमांक ६७२२ अन्वये धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने परिपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/ पी२०५९२५, दिनांक १५.०३.२०२४ अन्वये मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आलेली आहेत.

उपरोक्त मार्गदर्शक तत्वामध्ये ग्रामिण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना पिण्याच्या पाण्याची टाकी बांधणेकरिता भूखंड वाटपाबाबत कोणतेही धोरण नसल्यामुळे विविध ग्रामपंचायतींच्या विनंतीच्या अनुषंगाने अशा स्थानिक स्वराज्य संस्थांना पिण्याच्या पाण्याची टाकी बांधणेकरिता प्राधान्याने भूखंडाचे वाटप करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

midcconsultants.in

महामंडळाच्या सदस्य मंडळाच्या दिनांक २९.०७.२०२४ रोजी झालेल्या ४०० व्या बैठकीमध्ये पारीत ठराव क्रमांक ६७९५ अन्वये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

(१) परिपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/पी२०५९२५, दिनांक १५.०३.२०२४ मधील प्राधान्याने ऑनलाईन सरळ पध्दतीने भूखंड वाटपासंदर्भात नमूद १५ प्रयोजनांव्यतिरीक्त पुढीलप्रमाणे सुधारणा करणेत येत आहे.

| अ.क्र. | प्रयोजन | क्षेत्र | आकारावयाचा दर |
|---|---|---|---|
| १६ | ग्रामिण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना (Urban and Rural Local Bodies) पिण्याच्या पाण्याची टाकी बांधणेकरिता | आवश्यकतेप्रमाणे (केंद्र / राज्य शासनाच्या विविध योजनांतर्गत सार्वजनिक पिण्याचे पाणीपुरवठा योजनेला प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे.) | प्रचलित औद्योगिक दराने |

(२) उपरोक्त सुधारणेव्यतिरीक्त संदर्भिय परिपत्रकात कोणताही बदल करण्यात येत नाही.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

13.08.24

(अनिल भंडारी, भाप्रसे)
सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन)
मऔविम,अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

प्रत:
(१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुख्यालय, मुंबई
(२) मुख्य अभियंता (पुणे/छत्रपती संभाजीनगर/नागपूर)
(३) महाव्यवस्थापक (भूमी/ विधी/भूसंपादन/मा व तं /जनसंपर्क/ मबवि/डीएमआयसी/पणन)
(४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम
(५) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम
(६) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम
(७) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे/छत्रपती संभाजीनगर/ नागपूर.
(८) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
(९) सर्व औद्योगिक संघटना
(१०) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती / मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ, मुंबई / जागतिक व्यापार केंद्र, मुंबई.



midcconsultants.in
For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in